Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

CURRENT GLOBAL REVIEWER

Half Yearly - Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143

Issue XV Vol III, Feb. 2018


| | | | |
|---|---|---|---|
| 17 | भारतीय दर्शनातील 'आत्म' विषयक संल्पना | प्रा. शितल रुद्रमनी येरुले | 80 |
| 18 | समाजमाध्यमांचे स्वरूप | डॉ.सुनीता सांगोले | 84 |
| 19 | हरभरा पीक उत्पादकतेचा भौगोलिक अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा | प्रा.डॉ.आर.एस. धनुश्वर | 87 |
| 20 | सूर काव्य में गीति तत्व | स.प्रा.डॉ. राजेशप्रल्हादरावआरदवाड | 90 |
| | औरंगजेबाची धर्मनिती | प्रा.डॉ. बी.एस. लासुरे | 93 |

CURRENT GLOBAL REVIEWER
Half Yearly - Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143
Issue-X Vol III , Feb. 2018

# समाजमाध्यमांचे स्वरूप

डॉ.सुनीता सांगोले
दयानंद कला महाविद्यालय,लातूर

----------------(१८)----------------

भाषा म्हणजे विचार, भावना, अनुभव व कल्पना व्यक्त करण्याचे साधने असते. बोलणारा आणि ऐकणारा यांना जोडणारा धागा म्हणजे भाषा होय. सहयोग-सहकार्यासाठी परस्पर विनीमयाचे साधन म्हणून भाषा महत्त्वाची आहे. अनुकरणाने मूल भाषा शिकते. आपापल्या बुद्धी कौशल्याने गरजेनुरूप मूल भाषेचा विकास साधते. व्यक्तीच्या विकासाबरोबरच समाजाच्या विकासातही भाषेचे योगदान मोठे आहे. एकविसावे शतक हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे शतक आहे. तंत्रज्ञानातील क्रांतीचा संदेशवहनावरती परिणाम झाला आहे. माध्यम जगतात झालेल्या बदलांमुळे अभिव्यक्तीला नवे अवकाश लाभलेले दिसून येते. सोशल नेटवर्किंग हे अभिव्यक्तीचे संवादाचे अद्यावत स्वरुपाचे माध्यम आहे. त्यादृष्टीने भाषा आणि सोशल नेटवर्किंग या दृष्टीने शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत निबंधात केला आहे.

प्रत्येक शतक काही ना काही आपली वेगळी ओळख करुन देत असते. २१ व्या शतक हे 'इंटरनेट आणि वेब' माध्यमाचे युग मानले जाते. माध्यम शक्ती जाणून घेणे, तिचा अधिकांश वापर करुन घेणे हे विसाव्या शतकाच्या अंतापासूनच पहावयास मिळते. समाज प्रवाही असतो. कळानुरुप अनेक परिवर्तने समाजात येतच असतात. आताची माध्यम वापराची स्थिती पाहता आज असे लक्षात येते की, काळ बदलण्याची वेळ आली आहे. संप्रेषणाची ही नवी माध्यमे आपल्या जीवनाची अविभाज्य अंगेच बनत चालली आहेत. समाजाशी (आप्त, मित्र, व्यावसायिक, समाजिक, राजकीय संबंधातील व्यक्ती) जोडून राहण्याकरीता समाजमाध्यमांचा मुक्त वापर सुरू आहे. समाजमाध्यमे आमच्या जीवनाचा एक पैलू झाला आहे. त्यामुळे आपले राहणे, वागणे-बोलणे, कार्य, आनंदाचे क्षण, कल्पना, सुख-दु:खे, आकांक्षा, यशा-पयश अशा सर्वच अभिव्यक्ती समाजमाध्यमांवर सरास केल्या जातात. किंबहुना त्वरीत हे जाहीर करणे क्रमप्राप्तच आहे. अशा स्वरुपाचा रतिब समाजमाध्यमांवर पहावयास मिळतो आहे. समाजमाध्यमाच्या निमित्ताने अभिव्यक्तीचे हे खुले द्वार आजच्या काळाचे महत्त्वपूर्ण साधन बनले आहे हे सत्य होय.

समाजाचे निरिक्षण केले तर असे दिसून येते की, माणूस मूलतः समूहप्रिय प्राणी आहे. समाजात जात-धर्म, समाजिक स्तर, स्त्री-पुरूष भेद, आर्थिक स्तर, कामाच्या जागा, राहण्याची ठिकाणे यानुसार अनेक गट पहावयास मिळतात. कोणत्याही निमित्ताने हे संघटन होताना दिसते. उदा. महिला मंडळे, भजनी मंडळ, शिक्षक संघ, कला मंच, युवा, ज्येष्ठ नागरिक संघ, असे संबंध गरजेनुरूप कुठल्यातरी समानतेच्या धाग्याने जुळलेले असतात. याचे स्वरुप विस्तारत जाऊन 'नेटवर्क' चे रूप धारण करू लागते. या पद्धतीने माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरातून समाजमाध्यमांचा जन्म झाला आहे. आंदे कैप्लान आणि माइकल हेनलीन यांच्या मते, 'सोशल मिडिया' हे माहिती तंत्रज्ञानावर आधारलेले असे माध्यम आहे. ज्याद्वारे माहिती, कल्पकता, नवनिर्मिती करण्याची आणि त्यांचे आदान-प्रदान करण्याची सोय सुविधा होय. कुठल्याही वयातील व्यक्तींमध्ये या माध्यमाचे 'वेड' दिवसेंदिवस वाढतानाच दिसते आहे. माहिती संप्रेषणाचे सशक्त माध्यम वापरताना वापरताना सोशल नेटवर्किंग साईटस् वापरल्या जातात. हे एक असे माध्यम आहे जिथे कसल्याही अडथळ्याशिवाय तुमचा शोध, कल्पना, विचार तुम्ही जगापर्यंत पोहंचवू शकता. त्यातून नवे संशोधनही होऊ शकते. ज्ञानाचा विस्तार करण्याचे हे एक महत्त्वपूर्ण माध्यम आहे. इंटरनेटच्या माध्यमातून आपण खालील सेवासाधने उपभोगू शकतो.

१. समाज माध्यमे : फेसबुक, ट्विटर, लिंक्डइन
२. संवाद माध्यम : मेसेजिंग, स्नॅपचॅट, युटयूब , व्हाटस्अॅप, इंस्ट्राग्राम
३. स्काईप, गुगल, हैंगआऊट द्वारे प्रत्यक्ष संभाषण
४. ई -मेल टपालसेवा

जगातील सर्व लोक आपल्या गरजेनुरूप सुविधा निवडून त्यांचा वापर करतात. १९९० मध्ये प्रथम समाजमाध्यमांवर चर्चा झाली आणि १९९४ मध्ये जीओ साईटच्या रूपाने या वापराचा प्रमुख उद्देश एक वेबसाईट बनवून त्या माध्यमातून लोक एकमेकांशी बातचीत करू शकतील: विचारांची देवाण-घेवाण होऊ शकेल. प्रथमतः केवळ सहा शहरांसाठी बनविलेली ही सोशल साईट आज सर्व जगभर लोकप्रिय झाली. आज फेसबुक, ट्विटर, गुगल प्लस, लिंक्डइन, मायस्पेस, पिंटरेस्ट, आरकुट अशा सगळ्या सोशल नेटवर्किंग साईटस् जगाला एका धाग्यात गुंफण्याचे कार्य करत आहेत.

लोकप्रिय माध्यम, यावर आपल्या सृजनशील अविष्कार कधी कवितेच्या माध्यमातून, कधी विनोद निर्मिती करुन केली जाते. आपल्या अभिव्यक्तीसाठी कधी घटना-घडामोडींच्या निमित्ताने तर कधी चिकित्सक / संशोधक वृत्तीने एखाद्या विषयाचे केलेले विश्लेषण, परीक्षण काही वेळा तर अभिप्रायाच्या निमित्ताने केलेले भाष्य सुद्धा प्रभावी ठरू शकते. तेंव्हा रसिकमनाला आवाहन करणारी भाषा तुम्हाला अवगत हवी. प्रतिभेचा तिसरा डोळा लेखक, कलावंताला लाभलेला असतो. त्याने समाजाचे निरिक्षण करुन केलेल्या संकलनावर प्रतिभेने संस्करण करुन नेमक्या, आस्वाद्य भाषेत मांडणी केली जाते.

ब्लॉग लेखन तसा मराठी माणसाकडून थोडा दुर्लक्षित झालेला प्रकार आहे. गंभीरपणे एखाद्या विषयावर सातत्याने लेखन करणाऱ्या ब्लॉग लेखकांची जागतिक पातळीवर नोंद घेतली जाते. वेगळा विषय, अस्सल लिखाण, नाविन्यपूर्ण मांडणी यासाठी लागणारी प्रभावी भाषा यामुळे प्रसिद्धी तर मिळतेच उत्तम कमाईही होते.

युटयूब सारख्या माध्यमाचा अभ्यास करुन वापर केल्यास भरपूर संधी प्राप्त होऊ शकतात. स्थानिक पातळीवर होणाऱ्या वेबसिरीजच्या माध्यमातून देखील जगप्रसिद्ध होणे शक्य आहे. कथा, कथन, भाषण, किर्तन, व्याख्याने यांचे व्हिडीओ सुद्धा प्रचंड लोकप्रिय होत असताना दिसतात. या सगळ्या माध्यमातून अभिव्यक्त होताना ज्ञानाला उत्तम भाषेची जोड लाभली तरच अभिव्यक्ती प्रगल्भ होते. माणसाने व्यक्त होणे ही नैसर्गिक क्रिया आहे. जो व्यक्त होऊ शकतो तो जिवंत असतो. माणसाने व्यक्त होणे थांबवणे म्हणजे प्रगती रोखणे होय. ही अभ्यिक्ती जेंव्हा समूहापर्यंत, जगापर्यंत पोहंचते तेव्हा निश्चितच त्यातून नव्या दिशा मुखर होतात. याकरिता सद्यःस्थितीत उपलब्ध असलेल्या सोशल नेटवर्किंगचा पुरेपूर वापर करुन त्या समाजमाध्यमांद्वारे अभिव्यक्त होण्यासाठी विकास करणे ही काळाची गरज होय. भाषेची संवादात्मकता संज्ञानपन क्षमता, नाटयमयता, सृजनशीलता यांचा प्रभावी वापर करुन सोशल नेटवर्किंगच्या क्षेत्रात आपण आपला वेगळा ठसा निर्माण करु शकतो. शब्द सामर्थ्याला तंत्रज्ञानाची जोड देऊन ते अधिक प्रभावी करता येते आणि नेटवर्किंगच्या सहाय्याने त्याला विश्यात्मकता देता येते. यादृष्टीने मराठी माणसाने दमदार पाऊल उचलले आहेच हा प्रवास चौफेर होईल असा मला विश्वास वाटतो.

भाषा हे माणसाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. व्यक्तीच्या ज्ञानाचे, अनुभवाचे,आकलनाचे, प्रकटीकरणाचे माध्यम भाषा आहे. चांगल्या अभिव्यक्तीसाठी भाषा प्रभुत्त्व हवे. भाषा वापराचा परिघ जसजसा रुंदावत जातो तसतसे भाषेच्या रुपाची समृद्धता, समर्पकता, अर्थपूर्णता विकसित होणे गरजेचे ठरते. तंत्रज्ञानाच्या मदतीने लेखन-वाचन जर सुलभ, सहजसाध्य केले तर ते सर्वांपर्यंत पोहचणे सहज शक्य होईल. लक्षावधी लोक या माध्यमांनी जोडले आहेत. तेंव्हा मात्र वापर जबाबदारीने व्हायला हवा.

**निष्कर्ष :**

१. समाजमाध्यमे मानवी जीवनाची अविभाज्य अंगे बनत चालली आहेत.

२. समाजमाध्यमांद्वारे आपली अभिव्यक्ती जगासमोर ठेवणे शक्य झाले.

३. समाजमाध्यमे वापरताना जबाबदारीचे भान ठेवायला हवे अन्यथा हीच माध्यमे ऱ्हासाकडे नेतील.

४. जगाला आपली ओळख करून देण्याचे समाजमाध्यम हे अद्ययावत माध्यम आहे.

**संदर्भ :**

१. पानसे रमेश, भाषाग्रहण व भाषाशिक्षण, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १० जानेवारी २०१५
२. डॉ. भास्कर शेळके : प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा

# Current Global Reviewer


ISSN 2319-8648

Peer Reviewed

Impact Factor - 7.139

UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648



Edited By
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

SHAURYA PUBLICATION
Latur
Publisher
Shaurya Publication

www.rjournals.co.in